
जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर २०२२
वर्ष : ६५ अंक दुसरा

# पंचधारा

## शंकर रामाणी विशेषांक



RNI Reg. No. 32307/79 मूल्य : ९५/-
मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य हैदराबाद

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
मराठी साहित्य परिषद, (तेलंगण राज्य) या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र

# पंचधारा

## शंकर रामाणी विशेषांक

वर्ष ६५ वे, अंक दुसरा
जुलै ते सप्टेंबर २०२२
आषाढ श्रावण भाद्रपद १९४४

**संपादक मंडळ**

डॉ. विद्या देवधर (प्रमुख संपादक)
डॉ. शोभा देशमुख
डॉ. गीता काटे
प्रा. मीना जागीरदार
श्रीमती विद्या मक्तल
श्री. माधव रामराजे चौसाळकर

**अतिथी संपादक**

डॉ. अनुजा जोशी

**मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य**
इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७
RNI Reg. No. 32307/79

# अनुक्रमणिका

संपादकीय ........................................................................ ५

१. समकालीन वेधाचा सुंदर प्रवास
डॉ. अनुजा जोशी ........................................................ ७

२. जाणीव-नेणिवेच्या आभाळवाटांचा आर्तोत्सव
(शंकर रामाणी-काव्यशैली)
आश्लेषा महाजन ........................................................ १४

३. शंकर रामाणी यांची कविता
मंगेश नारायणराव काळे ................................................ २३

४. शंकर रामाणी यांच्या कवितेतील ऋतुसंवेदन आणि गूढगुंजन
सुनील शिनखेडे ........................................................ २९

५. शंकर रामाणींच्या कवितेतील 'प्रेमभावना' -
एक सर्जक चकवा
अरुण म्हात्रे ............................................................ ३८

६. शंकर रामाणी यांची निसर्गकविता
प्रा. विनायक लक्ष्मण बापट ............................................ ५१

७. 'कवी तळ ढवळतो तेव्हा....'
श्रीकांत देशमुख ........................................................ ६१

८. रामाणी यांच्या चिमण्यांचे पुनश्च सहर्ष स्वागत
अविनाश साळापुरीकर ................................................ ६६

पुस्तक परिचय :
१. **बालमनाला मोहवणारी काव्यरूप 'सूर्यफुले'**
स्नेहा अमोल मोरजकर ........ ७१

२. **शंकर रामाणींचे भावविश्व व्यक्त करणारी 'कातरवेळ'**
पूर्वा पंडित वस्त ........ ७५

३. **'आभाळवाटा' या काव्यसंग्रहाचा विवेचनात्मक परामर्श**
डॉ. विनय मडगांवकर ........ ८६

४. **विविधांगी रूपांनी नटलेला 'पालाण'**
स्नेहा संभाजी जांबोटकर ........ ९७

५. **गूढगर्भी कवितेचा आविष्कार 'दर्पणीचे दीप'**
प्रा. चिन्मय मधू घैसास ........ १०४

६. **मनाच्या गाभ्यातून - 'गर्भागार'**
राधिका रा. नागवेकर ........ १०९

**ग्रंथ परीक्षण :**
१. **साधार, सप्रमाण, संदर्भमूल्ययुक्त दस्तऐवज**
डॉ. सोमनाथ कोमरपंत ........ ११६

२. **पत्रांच्या सोबतीने गायलेले 'एकट्याचे गाणे'**
डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी ........ ११९

३. **''रामाणी'': शंकर रामाणी नावाच्या गूढाचा वेध**
प्रा. अरुणा गानू ........ १२४

**लेखक परिचय** ........ १२८

**स्वागत नव्या पुस्तकांचे** ........ १३२

पुस्तक परिचय : ३

# 'आभाळवाटा' या काव्यसंग्रहाचा विवेचनात्मक परामर्श

डॉ. विनय मडगांवकर



## प्रस्तावना

समर्थ रामदासांनी 'आता नमू कविश्वर जे शब्दसृष्टीचे ईश्वर', अशा शब्दात साहित्याची प्रतिसृष्टी निर्माण करणाऱ्या कवींचा गौरव केला आहे. मराठी साहित्यविश्वात प्रतिभावंत कवींनी शब्दार्थ अलंकारांनी शृंगारलेली, स्वतःची शब्दसृष्टी निर्माण केली आहे. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकात मराठी साहित्यसृष्टी आधुनिक कविताने समृद्ध झाली. यात गोमंतकीय कवी शंकर रामाणी यांचे योगदान महत्त्वाचे आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये त्यांच्या 'आभाळवाटा' या काव्यसंग्रहाचा विवेचनात्मक परामर्श घेतला आहे.

## गोमंतकीय मराठी परंपरा

गोमंतकाला मराठी साहित्याची गौरवशाली परंपरा लाभली आहे. डॉ. वि. बा. प्रभुदेसाई यांच्या मतानुसार कृष्णदास शामा या गोमंतकीय ग्रंथकाराने संत एकनाथांच्या 'एकनाथी भागवत' या ग्रंथाआधी ४७ वर्षांपूर्वी 'श्रीकृष्णचरित्रकथा' या ग्रंथाची रचना केली होती.[१] रा. चिं. ढेरे यांनी आपल्या संशोधनात नमूद केल्याप्रमाणे 'गोमंतकीय संतकवी कृष्णंभट्ट बांदकर यांनी, रंगभूमीवर संगीत नाट्यसृष्टी साकारली होती, जी पाहून अण्णासाहेब किर्लोस्कर भारावून गेले होते.'[२] 'गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला' या ग्रंथातील उल्लेखानुसार, गोवा-महाराष्ट्रात लोकप्रिय ठरलेली 'घनःशाम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला' ही भूपाळी, विठ्ठल केरीकर या गोमंतकीय कवीची आहे.[३] गोवामुक्तिपूर्व आणि नंतरच्या काळात विपुल प्रमाणात मराठी साहित्य निर्माण झाले होते. या गौरवशाली परंपरेचा वारसा जपणारे कविवर्य शंकर रामाणी यांनी गोमंतकीय मराठी साहित्य परंपरेत आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.

## रामाणींचा रमणीय काव्यसंग्रह 'आभाळवाटा'

गोमंतकीय कवी शंकर रामाणी यांचे 'सूर्यफुले, कातरवेळ, आभाळावाटा, पालण, दर्पणीचे दीप आणि गर्भागार' असे सहा कविता संग्रह आणि 'ऊर्मिला' ही संगीतिका प्रकाशित झाली आहे. आध्यात्मिकदृष्ट्या पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचतत्त्वांना विशेष महत्त्व आहे. या पंच तत्त्वापैकी कविवर्य शंकर रामाणी यांच्या कवितेत 'आकाश' तत्त्व वेगवेगळ्या प्रतिमा-प्रतीकांच्या रूपाने अवतरते. नभ, गगन, आभाळ, अंबर, आकाश असे विविध शब्द आहेत. यापैकी पर्जन्यवृष्टीने सृष्टीला नवचेतना प्रदान करणाऱ्या घनःशाम मेघांनी भरुन आलेले 'आभाळ' रामाणींच्या काव्यप्रतिभेला साद घालते. अंतराळात निनादणाऱ्या अलौकिक आकाशवाणीला, रामाणींनी अंतरमनातून दिलेला रमणीय प्रतिसाद, म्हणजे 'आभाळवाटा' हा त्यांचा कवितासंग्रह होय.

अंतरिक्षात असंख्य रहस्ये दडलेली आहेत. त्यांचा वेध घेत अमूर्त अशा अनाकलनीय आकाशाला गवसणी घालून त्याच्याशी नाते जोडण्याचा प्रयत्न रामाणींसारखे प्रतिभावंताच करू शकतात. प्रस्तुत संग्रहातील 'मेणबत्तीसारखे तेवणारे तिचे डोळे' या कवितेत याचा प्रत्यय येतो.

*"तिच्या अस्तित्वाच्या आभाळवाटा अंगाअंगातून पाजळतात*
*अनंताशी अबोल नाते जोडून थेंब थेंब जगतांना"*

असा एक प्रयत्न ग. दि. माडगूळकरांनी केला होता. 'गीत रामायणात' सीतास्वयंवराचा प्रसंग वर्णन करण्यासाठी त्यांनी आकाशासी जडले नाते धरणीमातेचे स्वयंवर झाले सीतेचे या अनुपम गीताची रचना करून आकाशासी धरणीचे नाते जोडले होते.[४] अशा भारतीय पुराण कथांचे, ग्रंथांचे तसेच संतसाहित्याचे संस्कार शंकर रामाणी यांच्या कवितेवर दिसून येतात.

## काव्यप्रतिभेवर संतसाहित्याचा प्रभाव

गोमंतकातील बा. भ. बोरकर, दामोदर अच्युत कारे, जीवनमुक्त महाराज, गजानन रायकर या समकालीन कवींप्रमाणे शंकर रामाणी यांनाही मराठी संतसाहित्यामधून पर्याप्त वाङ्मयीन जीवनसत्व प्राप्त झाले होते. त्यांच्या विविध रचनांवर संतसाहित्याचा प्रभाव दिसून येतो. त्यांच्या 'आभाळवाटा' या कवितासंग्रहातील 'देगा दान' या कवितेत हे जाणवते.

*"हेचि दान दे गा दान*
*कुबेरली काया*

*फुलो फळो माया*
*आकाशाची''*

या कवितेत रामाणींचे सोज्वळ कविमन 'फुलो फळो माया आकाशाची' म्हणून मागणे मागते. 'हेचि दान दे गा दान' अशा शब्दांमुळे येथे संत तुकारामांच्या 'हेचि दान देगा देवा तुझा विसर न व्हावा' या अभंगाचे स्मरण होते. त्यांच्या 'दर्पणीचे दीप' या संग्रहातील 'पेन्शनर' या कवितेत संत तुकारामांचा संदर्भ स्पष्टपणे दिसून येतो. 'पेन्शनर' कवितेत ते रामाणी तुकोबाच्या डोळ्यांत उमलून नुमललेला एक आर्त दुर्लक्षित अभंग असा विरोधाभास निर्माण करतात. [५] 'अभंग' आणि 'ओवी' अशा छंदामधून निर्माण झालेले संतसाहित्य, लोकमानसात भक्तिभावनेने स्थापित झाले आहे. रामाणीनी या छंदावरच कविता रचल्या आहेत. 'एक अभंग', 'अश्रूंचा अभंग', तसेच 'आसवांची ओवी' अशा त्यांच्या काव्यरचना आहे. 'आसवांची ओवी' या कवितेतील भावार्थ उल्लेखनीय आहे.

*''रुजू आले खोल*
*वैशाखाचे बीज*
*आषाढक्षितिज*
*वाकलेले*
*वेदनेची वीज*
*उरी जोजवावी*
*आसवांची ओवी*
*अनुभवावी''*

'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानेश्वरी । एक तरी ओवी अनुभवावी॥' संत नामदेव, ज्ञानेश्वरी विषयी असे म्हणाले होते. उपरोल्लेखित 'आसवांची ओवी' कवितेत 'वेदनेची वीज उरी जोजवावी,' असे सांगत असताना 'आसवांची ओवी अनुभवावी' असे कवी आवाहन करतात. रामाणींच्या आध्यात्ममग्न काव्यात पारमार्थिक साक्षात्काराची अनुभूती येते. 'श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीपाशी' ही अशीच एक अतिशय आशयगर्भीत काव्यरचना आहे. संतसाहित्याच्या अध्ययनाने निर्मल झालेले कविमन, वैष्णव भक्तांच्या आध्यात्मिक प्रगल्भतेचा वेध घेते. 'नाम संकीर्तन साधन पै सोपे । जळतील पापे जन्मांतरीची ॥' असे संत तुकारामांचे अभंगवचन आहे. तद्रूप 'श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीपाशी' या कवितेत, कवीने आपल्या इंद्रायणी काठी वाळवंटात विमुक्त होऊन नर्तन करणाऱ्या भाविकांचे सात्विक भाव दर्शवणारे आलेखन केले आहे.

*"पाप्यालाहि भिडे*
*आळंदीची वाट*
*मृदुंगते साथ*
*वैष्णवांची*
*दुपारल्या डोळा*
*इंद्रायणी वाहे*
*कौतुक होताहे*
*संचिताचे*
*अबोलाचा बोल*
*वाळवंटी रुजे*
*वांज ऊर माझे*
*शब्दब्रह्म"*

प्रस्तुत कवितेतील 'शब्दब्रह्म' लक्षवेधी आहे. 'भारतीय विद्वांनी ध्वनीपासून विश्वाची उत्पत्ती झाली असल्याचे ह्मटले आहे. तर प्राचीन ऋषीमुनींनी परमेश्वराचा म्हणजेच ब्रह्माचा साक्षात्कार 'शब्दब्रह्म' स्वरूपात होत असून त्याची सूक्ष्म स्पंदने अवकाशात सर्वत्र होत असल्याचे मानले आहे.'[६] याच शब्दब्रह्माची वलयांकित स्पंदने रामाणींच्या कवितेत जाणवतात. त्यांच्या 'गर्भागार' या काव्यसंग्रहात 'शब्दब्रह्म' याच नावाची त्यांची कविता आहे. त्यात 'कोण मी कुठला, एकट्या वाटेचा, ओठावर ऋचा, शब्दब्रह्म' अशा शब्दात स्वत्वाचा शोध घेतांना, आध्यात्मिक मूल्य संवर्धित करतात.

**राधा आराधना**

भारतात श्रीकृष्ण चरित्रकथा सर्वश्रुत आहे. श्रीकृष्णकथेप्रमाणे कृष्णसखी 'राधा' ही मनोरम प्रेमप्रतिमा संत, पंत, पंडितांच्या साहित्यामधून विविध रूपाने प्रकट झाली आहे. आधुनिक मराठी कवींच्या साहित्यसृष्टीतही सोज्वळ प्रेममय 'राधा' अवतरली आहे. बा. भ. बोरकर यांच्या 'चित्रवीणा' संग्रहातील मिलनक्षेत्र कवितेतील 'राधा', पु. शि. रेगे यांच्या 'सुहृदगाथा' संग्रहातील 'त्रिधा राधा' वाचकांना सुपरिचित आहे. शंकर रामाणी यांच्या 'राधा' या कवितेत राधादर्शन होत आहे. प्रस्तुत कवितेतील व्रतस्थ समर्पणशील राधेचा तेव्हापासून 'अजाणते यमुनेचा ठाव' असा आत्मीय प्रीतीभाव उदात्त भक्तिभावात परिवर्तीत होत आहे.

मूलतः प्राचीन काळापासून श्रीकृष्णचरित्र कथन करणारा 'श्रीमद्‌भागवत' या मूळ ग्रंथाच्या दशम स्कंदामध्ये राधेचे दर्शन होत नाही. महाभारत आणि

श्रीमद्‌भागवत गीता ग्रंथातही राधेचा उल्लेख नाही हे वास्तव आहे.

## आदर्शाची भक्ती

जीवनातील सौंदर्याला साद घालत आदर्शाची भक्ती करणे, हा कवी शंकर रामाणी यांचा मनोधर्म आहे. हे त्यांच्या 'मन आकाशाचे' या कवितेतून प्रतीत होते.

*"शुभ्र नक्षत्र फुलांनी*
*माझे माखले आभाळ*
*आली सावळ्या दिशांना*
*जाइजुईची भोवळ*
*आज अवसेची रात*
*कळ्याकळ्याना बहर*
*सारे गगन वाकले*
*सोसताना फुलभार*
*देणाऱ्याने दिले हात*
*असे घेण्यासाठी दान*
*मन आकाशाचे तरी*
*माझी ओंजळ लहान"*

कवितेत अवसेची रात असली तरी शुभ्र नक्षत्र फुलांनी 'आभाळ' माखले आहे, फुलभार सोसताना 'गगन' वाकले असून दात्याचे मन मात्र 'आकाशाचे' आहे. अथांग, अनासक्त, आदर्शवत. प्रांजळपणे मन:संवाद साधणारी ही अर्थवाही कविता आत्ममग्न आहे.

## मानवी भावना अभिव्यक्त करणारा निसर्ग

शंकर रामाणी यांची साहित्यसृष्टी मानवी जीवनातील सर्जनशक्तीवर आधारित आहे. त्यामुळे त्यांच्या कवितांमधून निसर्गाच्या शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि नादातून सर्जनशक्तीच्या ऐश्वर्याचा साक्षात्कार होतो. त्यांच्या कवितेत आविष्कृत होणार निसर्ग मानवी भाव-भावना अभिव्यक्त करणारा आहे. कटू अनुभव कवटाळून जीवन जगणे, हा कवीचा स्वभाव नाही, म्हणून 'वैशाखी उन्हात' सुद्धा सौंदर्यशोधनात रामलेले कवी शंकर रामाणी 'उन्हाळा' या कवितेत म्हणतात...

*"चाफ्याहून तीव्र उन्हाचा वैशाखी घमघमाट*
*अंतर्बाह्य चुकल्यामुकल्या पक्षांचा सूर आसमंतात"*

संवेदनशील निसर्ग प्रतिमा त्यांच्या 'शल्य' या कवितेतील 'जाइच्या हसूत खोल खुपत शल्य राहिले' या ओळीत दिसून येते. 'फुटे प्राजक्ताचा सूर' या कवितेत 'साकळल्या वेदनेला फुटे प्राजक्ताचा सूर' श्रवण करण्याची किमया रामाणीच करू शकतात. निसर्ग प्रतिमांनी प्रफ्फुल्लीत होणारी विपुल शब्दसंपदा, ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये आहेत.

**मुग्ध जीवनजाणिवांचा वेध**

'रंग' हे जसे चित्रकाराचे मूलद्रव्य असते, त्याप्रमाणे 'भाषा' हे साहित्यिकाचे मूलद्रव्य असते. शंकर रामाणी यांच्या कवितेतून प्रवाहित होणारी 'भाषा', कवितेचे केवळ मूलद्रव्य म्हणून राहत नाही, तर ती काव्यातील प्रतिमा-प्रतीकांच्या मुग्ध अंतर्मनाचा वेध घेते. रामाणींच्या 'माझिया दारात' या कवितेत याचा प्रत्यय येतो.

*''माझिया दारात*
*चिमण्या आल्या*
*अबोल काहीसे*
*बोलून गेल्या*
*कळले सारे नि*
*कळले नाही*
*मनाची अबोध*
*हासली जुई''*

शंकर रामाणी यांच्या कवितेविषयी जेष्ठ समीक्षक सु. म. तडकोडकर लिहितात, 'आधुनिक मराठी काव्यात पारंपरिक कथनात्माकता टाळण्यासाठी प्रतीकांना महत्त्व लाभू लागले होते. स्थानिक भाषांतील प्रतीके अग्रस्थान संपादू लागली. त्यामुळे अलंकारिक लयबद्धतेला महत्त्व देण्याऐवजी आंतरिक लयबद्धतेला स्वीकारार्हता लाभू लागली होती. रामाणीच्या कवितेत नेमके या दोहोंचे मिलन झालेले दिसते.'[७] 'दारी साधते कोकिळा' ही अशीच मुग्धमधुर भावनाप्रधान काव्यरचना आहे.

*''दारी साधते कोकिळा*
*तरी फुलेनाच चाफा*
*साद कोकिळेची खोल*
*मुके पापणीत आसू*
*गळा साचलेला बोल''*

'आभाळवाटा' या कवितासंग्रहामधील 'शाप' या कवितेतील 'मौनदिवे',

'श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीपाशी' या कवितेतील 'अबोलाचा बोल', 'धुके' या कवितेतील 'मुकेपणात गगन झाकले', 'दारी साधते कोकिळा' या कवितेतील 'मुके पापणीत आसू गळा साचलेला बोल', 'शाप' या कवितेतील 'अजुनी मंद मौनदिवे', अशा प्रतिमा-प्रतीकांच्या माध्यमाने कविता आकार घेते. तर 'आंबा फुलेना' या कवितेत रावा परदेशी गेल्यामुळे विरही झालेल्या अबोल मैनेच्या मनाचा, मुग्ध जीवनजाणिवांचा कवी वेध घेतात.

### संदिग्ध अज्ञाताचा शोध

संदिग्ध अज्ञाताचा शोध घेत स्वाभाविकपणे गूढ अर्थवलय निर्माण करणाऱ्या त्यांच्या काही काव्यरचना आहेत. त्यांच्या 'गूढ' या कवितेतील अंधाराचे भेसूर गांभीर्य, 'सावल्यांचा धाक' सारख्या शब्दांमुळे अधिकच गंभीर भासते.

*"सांजवनातून उठे*
*काळोखाची हाक*
*पावलांच्या वाटेवर*
*सावल्यांचा धाक"*

गूढ गंभीर आशय मांडताना, ते आकारबद्ध शब्दचित्रे निर्माण करतात. 'ऐशा सुकृताचा थेंब'या त्यांच्या कवितेत हा समन्वय पाहायला मिळतो.

*"गूढ मौनाच्या सावल्या*
*गर्भगंगेत नाहाल्या*
*काळजाच्या काठावर*
*एकांतात विसावल्या"*

कवीला गूढ मौनाच्या सावल्या जाणवतात, गांभीर्याचा ते आभास निर्माण करतात. भावतल्लीन होऊन एकांताचा अनुभव शब्दात मांडणाऱ्या या कवितेचा रचनाबंध लक्षवेधी आहे.

### वेदनेचे अंतःस्थ हुंकार

कवीचे मन सौंदर्यासक्त असले, तरी त्यांना वास्तवाचे भान आहे. त्यांच्या 'शाप' या कवितेत त्यांच्या मनातील शल्याची जाणीव होते.

*"विजलेल्या रात्रीचे*
*अजुनी मंद मौनदिवे*
*झाडांच्या मुग्ध तळी*
*छायांचे जळ फसवे."*

अशा शब्दात ते व्यथित होऊन तटस्थपणे आपल्या भावना मांडतात. रामाणींच्या संवेदनशील मनातील असे अंतःस्थ हुंकार, त्यांच्या 'अशी वैशाख लहर' या कवितेत शब्दबद्ध झाले आहेत.

*"असे नेहमीच घ्यावे*
*माथा वैशाखाचे उन*
*असे नेहमीच जावे*
*इथे लासून पोळून*
*कोरड्या जिव्हाळ्याची*
*इथे देणाऱ्याची भाषा*
*इथे उमाळ्यावाचून*
*ओला डोळ्यांना दिलासा"*

जीवनानुभवाचे सार कवी आपल्या काव्यातून अभिव्यक्त करतात. घटीत प्रसंगाचे बरे-वाईट परिणाम, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कवीच्या/जीवनावर तथा त्याच्या कवितेवरही अंशतः दिसून येणे स्वाभाविक आहे. याला रामाणीही अपवाद नाहीत. वास्तविक कवी ज्या काळात कार्यरत असतात त्या कालचा, सांस्कृतिक-राजकीय परीप्रेक्षाचा प्रभाव त्यांच्या साहित्यावर होतो. त्या काळात गोव्यातील पोर्तुगाली सालाझारशाही रामाणीनी निश्चित अनुभवलेली होती. तत्कालीन गोमंतकीय कवी बा. भ. बोरकर, जीवनमुक्त महाराज, गजानन रायकर यांच्या साहित्यात जसे सत्तासंघर्षाचे प्रतिबिंब झळकते, तसे शंकर रामाणी यांच्या काव्यात ते प्रतिबिंबित झाले नाही.

### प्रीतीविरह : कवितेचा विलक्षण स्रोत

शंकर रामाणी यांच्या स्नेहविरही आशय व्यक्त करणाऱ्या रचना आहेत. त्यांच्या विरहकवितेविषयी डॉ. के. के. अहिरे लिहितात, 'कवी रामाणी दुःखासह, दुःखस्मृती, विस्मृतींचा गोफ विणून सहन करतात. प्रीतीविरहाला, विफलतेला दुषणे देत नाहीत. प्रेमाची व्यथा-कथा प्रदर्शित करत नाहीत. वियोगाची निराशा उद्वेगजनक नसून प्रीतीविफलतेचे दुःख त्यांच्या प्रेमकाव्यात भरलेले आहे. त्यांच्या प्रेमकाव्यात नैराश्य, भावनाप्रदानता, प्रेमातली विफलता, वियोगावस्था, एकाकीपणाची जाणीव यांचे भावपूर्ण मिश्रण आहे.'[८] रामाणींची 'तू निघून गेल्यावरही' ही अशीच रचना आहे.

*"तू निघून गेल्यावरही*
*जे विझून उरले गाणे*
*ते हृदय अकारण बसले*
*कवटाळून स्वप्न दिवाणे..."*

सामान्यतः 'प्रेम' भावनेमधून कवीला काव्यरचनेला स्त्रोत प्राप्त होतात; परंतु मानवी जीवनातील सहजप्रवृत्ती असलेल्या प्रेमभावनेची अनुभूती, सर्वांना प्राप्त होतेच असे नाही. काही जणांना प्रीतीविरहालाही सामोरे जावे लागते. त्या भावनेतूनही काव्य आकार घेते; हे रामाणींच्या अशा कविताच्या अध्ययनाने स्पष्ट होते.

## शब्दांचा मितव्यय आणि सर्वात्मकता

'कविता ही सर्वोत्तम शब्दांची सर्वोत्तम व्यवस्था असते', असे कोलरेज यांनी म्हटले आहे. तर डब्ल्यू ओडीना यांच्यामते 'चांगल्या कवितेच्या रचनेचे सौंदर्य, नेटकी मांडणी, शब्दांचा मितव्यय आणि सर्वात्मकता यात असते. या दोन्ही निकषावर शंकर रामाणी यांच्या कविता तंतोतंत उतरतात.

'वाटा' ही अत्यंत छोटीसी रचना सहा ओळींची आहे.

*"पुसाव्यात कोणा*
*काळजाच्या वाटा?*
*खूपलेला काटा...*
*... तितुकी जपावे*
*डोळ्यात पाणी*
*तुडुंब कहाणी"*

'हिशेब' ही कविता चार ओळींची आहे.

*"कसा करावा आपल्या*
*देण्याघेण्याचा हिशेब?*
*रत्नखचित रातीचे*
*खाली वाकलेले नभ!"*

'तळे' ही कविता दोन ओळींची आहे.

*"स्वच्छ एकटेच तळे*
*सुखावले चांदण्यात"*

उपरोल्लेखित रचनांप्रमाणे गोंदण, वाटा, एक कविता, हिशेब, आठवण, चिमण्या, या कवितांमधून त्यांची आल्हाददायक मितभाषी लेखनशैली दिसून येते.

डॉ. अशोक मणगूटकर यांच्या शब्दात सांगायचे झाले तर, 'रामाणींची कविता जीवनातील चैतन्य घेऊन आकाराला येते.[१] एकदोन वाक्यात ते संपूर्ण भावाविष्कार सहजतेने व्यक्त करतात 'आभाळवाटा' या कवितासंग्रहातील दोन ओळीच्या 'तळे' या कवितेत जमिनीवरचे 'स्वच्छ एकटेच तळे, चांदण्यात सुखावत आहे,'

**समारोप**

शंकर रामाणी यांचा सर्जनशील स्वभाव हाच त्यांच्या साहित्यसृष्टीचा मूलाधार आहे, तर निसर्गाचे मानवीकरण हा त्यांचा काव्यप्रतिभेच्या ऐश्वर्याचा सोज्वळ आविष्कार आहे. निसर्गाच्या माध्यमाने मानवी भाव-भावना अभिव्यक्त करण्याचे गुढ असले तरीही मनोरम कौशल्य त्यांना अवगत आहे. संतसाहित्याच्या प्रभावामुळे त्यांच्या काव्यामधून आध्यात्मिक विचारधारा प्रवाहित होत आहे. त्यामुळे प्रेमविफलता आणि सौंदर्यशोधन या भिन्न विषयांमध्ये समांतर दिसून येते. श्रीमद्भागवत गीतेत सुख आणि दुःख यांच्याकडे समभावनेने पाहण्याची 'स्थितप्रज्ञ' वृत्ती वर्णन केली आहे. अशी समतोल अभिजात अभिव्यक्ती रामाणींच्या कवितेत दिसून येते.

**निष्कर्ष**

गोमंतकाला मराठी साहित्याची गौरवशाली परंपरा लाभली आहे, हे साहित्यइतिहास अध्ययनाने सप्रमाण सिद्ध झाले आहे.

गोमंतकीय कवी शंकर रामाणी त्यांच्या सर्जनशील काव्यरचनामुळे सुपरिचित होते.

संतसाहित्याच्या प्रभावामुळे त्यांच्या पारमार्थिक काव्यात आत्ममग्न साक्षात्काराची अनुभूती येते.

गोवामुक्ती पूर्वकाळात तत्कालीन गोमंतकीय कवी बा. भ. बोरकर, जीवनमुक्त महाराज, गजानन रायकर यांच्या साहित्यात पोर्तुगाली सत्तेविरुद्ध जनतेच्या संघर्षाचे प्रतिबिंब झळकते. त्याच काळातील शंकर रामाणी यांच्या काव्यात हा विषय कुठेच प्रतिबिंबित झालेला नाही. जीवनातील सौंदर्याला साद घालत आदर्शाची भक्ती करणे, हा कवी शंकर रामाणी यांचा मनोधर्म असला तरी त्यांना वास्तवाचे भान आहे. हे त्यांच्या कवितेतून प्रतीत होते.

शंकर रामाणी आपल्या काव्यातील निसर्ग प्रतिमा-प्रतीकांच्या माध्यमाने मुग्ध जीवनजाणिवांचा वेध घेतात. तसेच गूढ अर्थवलय निर्माण करणाऱ्या संदिग्ध

अज्ञाताचा शौध घेत आकारबद्ध शब्दचित्रे निर्माण करतात. त्यांची लेखनशैली मितभाषी असली, तरी ती आल्हाददायक आहे.

संत, पंत, पंडित तसेच रामाणीसारख्या आधुनिक कवींच्या साहित्यामधून कृष्णसखी म्हणून दिसून येणाऱ्या राधेचा उल्लेख श्रीकृष्णचरित्र कथन करणाऱ्या 'श्रीमद्‌भागवत' या मूळ ग्रंथात तसेच महाभारत आणि श्रीमद्भागवत गीता ग्रंथातही नाही. सुख-दुःखाला समभावनेने पाहण्याच्या 'स्थितप्रज्ञ' वृत्तीमुळे, त्यांच्या कवितेत समतोल अभिजात अभिव्यक्ती दिसून येते.

**संदर्भ सूची :**


१) प्रभुदेसाई, वि. बा., (संपा.) कृष्णदास शामा-विरचित श्रीकृष्णचरित्रकथा, मुंबई साहित्य संघ प्रकाशन, मुंबई, १९७५, पृ. चार.

२) रा. चिं. ढेरे भारतीय रंगभूमीच्या शोधात; पद्मगंधा प्रकाशन, पुणे, १९९६, पृ. एक.

३) प्रभुदेसाई, वि. बा. (संपा.) गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला, गोमंतक मराठी अकादमी, गोवा, २००३, पृ. २७७.

४) माडगूळकर, ग. दि., गीत रामायण, प्रकाशन विभाग, सूचना आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, १९५७, पृ. ४५.

५) जोशी, अनुजा, (संपा.) शंकर रामाणी यांची समग्र मराठी कविता, गोवा मराठी अकादमी, गोवा, २०२२, पृ. १६८.
https://hi.wikipedia.org/wiki/शब्दब्रह्म

६) तडकोडकर, सु. म., कविवर्य शंकर रामाणी जन्मशतसांवत्सरिक, कविवर्य शंकर रामाणी जन्मशताब्दी समारोह समिती, गोवा, २०२२ पृ. १९.

७) अहिरे, के. के., कविताव्रती कवी शंकर रामाणी, अथर्व पब्लिकेशन्स, २०११, पृ. ३२.

८) नाडकर्णी, एस. एस., (संपा.) गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा, गोमंतक मराठी अकादमी, गोवा, २००३, पृ. १४.


■